लोकमत

# विद्यापीठाच्या १२ परीक्षांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाकडून हिवाळी सत्रामधील परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात येत आहेत. विद्यापीठाने गुरुवारी विविध १२ परीक्षांचे निकाल ऑनलाइन जाहीर केले. एम. फिल. पीएचडी. ऑनलाइन प्रवेश परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत आक्षेप, त्रुटी नोंदविण्याचा आज, शुक्रवार हा अखेरचा दिवस आहे.

विद्यापीठाने निकाल जाहीर केलेल्या परीक्षांमध्ये एल. एल. एम. सत्र एक ते चार, एम. ए. होमसायन्स सत्र तीन, एम. ए. भाषा प्राद्योगिकी सत्र तीन, बी. फार्म. सत्र तीन, चार, सहा आणि आठ, बी. आर्किटेक्चर सत्र नऊ आणि दहा या अभ्यासक्रमांचा समावेश होता. आतापर्यंत एकूण ६१ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत.

दरम्यान, विविध २६ पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ऑनलाइन परीक्षा गुरुवारी झाल्या. त्यासाठी एकूण २७१३१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २६३६६ जणांनी परीक्षा दिली, तर २६५ जण गैरहजर राहिले.

# विद्यार्थ्यांचे लसीकरण महाविद्यालयांत; उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत

**रायगड :** लसीकरण केंद्रांवरील वाढती गर्दी लक्षात घेऊन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे लसीकरण महाविद्यालयात करण्यात येणार आहे. यासाठी येत्या शनिवारी मुख्यमंत्री दालनात बैठक होऊन अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिली. बारावीची विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेऊनच परीक्षा घेण्याचा निर्णय शासन घेण्याची शक्यता आहे. बारावी परीक्षा दिली तरी सीईटीची परीक्षा घेण्यावर मात्र शिक्षण विभाग ठाम आहे. मे अखेर किंवा जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात ऑनलाईन पद्धतीने सीईटीची परीक्षा घेण्यात येईल, असे सामंत यांनी जाहीर केले.

# ऑनलाईन परीक्षेला २६ हजार विद्यार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ परीक्षेअंतर्गत गुरुवारी झालेल्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षेसाठी २७ हजार १३१ विद्यार्थ्यांपैकी २६ हजार ३६६ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा दिली. दरम्यान, परीक्षा विभागाच्या वतीने आजअखेर ५० हून अधिक परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. ६ मे रोजी १२ परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले. यात एलएलएम.सत्र-१,२,३ व ४; एम.ए.-होम सायन्स सत्र-३; एम.ए. भाषा प्राद्योगिकी सत्र-३; बी. फार्मसी सत्र-३,४, ६ व ८; बी. आर्किटेक्चर सत्र- ९ व १० या निकालांचा समावेश आहे.